**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५ व ७/२०१७-१८/२२६ दिनांक: १५-०६-२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ५ व ७ /२०१७-२०१८**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. दत्तात्रय विठ्ठल पाटील, मु.पो. तुरची ता.तासगांव जि. सांगली | **तक्रार** |
| २) | श्री नथुराम धोंडीबा कोळापटे,मु.पो.मानोली (आंबा) ता. शाहूवाडी , जि. कोल्हापूर | **अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मंडल कार्यालय, सांगली/ कोल्हापूर | |
| २) | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग सांगली ग्रामिण/ग्रा.वि.१ कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग तासगांव दोन/शाहूवाडी | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**संयुक्त न्यायनिर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) प्रस्तुतच्या दोन्ही प्रकरणातील तक्रारदार यांनी शेती पंपासाठी नविन वीज जोडणी आणि विलंबाची भरपाई मागितली असून या सर्व प्रकरणांचे स्वरुप समान प्रकारचे असल्याने त्यांचा निर्णय या संयुक्त न्यायनिर्णयाने (Common Judgment) करणेत येत आहे.

**<u>गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.</u>**

२) केस क्र.५ मधील तक्रारदार श्री दत्तात्रय विठ्ठल पाटील , यांनी शेती पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी वि.प. यांच्या संबंधीत कार्यालयात दि.१५-०९-२०१४ रोजी रितसर अर्ज देऊन दि. ११-१२-२०१५ रोजी कोटेशनची रक्कम भरणा केली.

केस क्र.७ मधील तक्रारदार श्री नथुराम धोंडीबा कोळापटे यांनी शेती पपांसाठी नविन वीज जोडणी मिळणेचा अर्ज दिनांक २४-०२-२०१४ रोजी वि.प.कडे सादर करुन दिनांक ०३-०८-२०१४ रोजी कोटेशनप्रमाणे रक्कम भरणा केली.

तथापि सदर तक्रारदार यांना कृतीमानके विनियम मधील तरतूदीप्रमाणे विहीत कालावधीत वीज जोडणी देणेत आली नाही. त्यामुळे तक्रारदार श्री दत्तात्रय पाटील यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दिनांक ०५-०१-२०१७ रोजी आणि तक्रारदार श्री नथुराम कोळापटे यांनी दि. १८-०२-२०१७ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष,कोल्हापूर याचेकडे तक्रार अर्ज दाखल केले . सदरचे तक्रार अर्जचा निर्णय अनुक्रमे दि.२८-०२-२०१७ व दि. २१-०३-२०१७ रोजी सदर कक्षांनी करुन तक्रारदार यांना जेष्ठता यादीप्रमाणे वीज कनेक्शन देणेत येतील असे आदेश केले.त्या निर्णयावर नाराज होऊन सदर अपिले या मंचासमोर अनुक्रमे दिनांक १०-०४-२०१७ व दि. ११-०४-२०१७ रोजी तक्रारदार यांनी दाखल केली आहेत.

**<u>वि. प. यांची भूमिका.</u>**

३) तक्रारदार श्री दत्तात्रय पाटील यांनी दि. १९-०९-०२०१४ रोजी वीज जोडणी मिळणेचा अर्ज दिलेनंतर अतिरिक्त कार्यभार असलेमुळे कोटेशन देण्यास विलंब झाला होता. प्रतिक्षा यादीत त्यांचे नाव १७० व्या क्रमांकास नोंद आहे. त्यांना वीज जोडणी देणेसाठी ०.२५ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम करावे लागणार आहे.

तक्रारदार श्री नथुराम कोळापटे यांचा जेष्ठता यादीत १४ वा क्रमांक आहे. नविन कंत्राटदार नेमल्यानंतर त्यांना त्वरीत वीज जोडणी देण्यात येईल.

४) या दोन्ही प्रकरणांची सुनावणी दि. ०९-०६-२०१७ रोजी या मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार श्री दत्तात्रय पाटील यांचे प्रतिनिधी श्री जहीर नबीलाल मुल्ला आणि तक्रारदार श्री नथुराम कोळापटे यांचेतर्फे प्रतिनिधी श्री विनोंद कांबळे, हजर होते. केस क्र.५ मध्ये वि.प.तर्फे उपकार्यकारी अभियंता श्री बी.पी. व्हनमाने आणि केस क्र. ७ मध्ये उपकार्यकारी अभियंता श्री अभय शामराज उपस्थित होते. वरील सर्वाचे तोंडी युक्तिवाद ऐकले. उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार श्री दत्तात्रय पाटील व श्री नथुराम कोळपाटे यांना निश्चित कालावधीमध्ये शेती पंपासाठी नवीन वीज जोडणी देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) सदर तक्रारदार यांना झालेल्या विलंबाबद्दल भरपाई देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- नाही

३) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## कारणमिमांसा

६) तक्रारदार श्री दत्तात्रय पाटील यांनी त्यांच्या मौजे तुरची या गावातील गट क्र. ८४८ यामध्ये, आणि तक्रारदार श्री नथुराम कोळपाटे यांनी मौजे मानोली येथील त्यांच्या गट क्र. २४० या जमिनीत शेती पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेबद्दल अर्ज सादर करुन नंतर कोटेशन प्रमाणे जरुर त्या रकमा वि.प.कडे भरणा केल्या. दत्तात्रय पाटील यांना कोटेशन देण्यामध्ये निमणे शाखा कार्यालयात बराच काळ शाखाधिकारी नसल्यामुळे व अतिरिक्त कार्यभारामुळे विलंब झाल्यामुळे दंडात्मक कारवाई करणेत येऊ नये अशी वि.प. तर्फे विनंती करण्यात आली. तक्रारदार श्री दत्तात्रय पाटील यांना तीन महिन्यात आणि तक्रारदार श्री नथुराम कोळपाटे यांना एक वर्षात नविन विज जोडणी दिली नाही असे त्यांच्या प्रतिनिधी यांनी मंचासमोर सांगितले.

७) अर्थात, तोडी युक्तिवादाचे वेळी उभय प्रितिनिधी पैकी कोणीही विलंबाच्या भरपाईची मागणी मंचासमोर केलेली नाही. म्हणजेच सदर भरपाईची मागणी त्यांनी स्वखुषीने सोडून दिली आहे, असे म्हणता येईल. तथापि त्यांनी एका निश्चित कालावधीत, लौकरात लौकर वीज जोडण्या देण्याचा आदेश करावा अशी विनंती केली आहे. वि.प. तर्फे असे कथन करण्यात आले की, प्रथम येणा-यास प्रथम या तत्वावर प्रतिक्षायादीप्रमाणे वीज जोडणी देणेचा आदेश करावा.

८) विद्युत कायदा २००३ च्या कलम ४३प्रमणे आणि कृतीमानके विनियम २०१४ मधील परिशिष्ट अ यातील तरतूदीप्रमाणे एका विशिष्ट कालावधीत वीज पुरवठा सुरु करण्याचे बंधन घातले आहे. त्यानुसार तक्रारदार यांना मुदतीमध्ये वीज जोडणी मिळाली नाही, हे स्पष्ट आहे. विद्यत पुरवठा संहिता विनियम २००५ मधील कलम ४.४ मध्ये "प्रथम येणा-यास प्रथम"या तत्वावर वीज पुरवठा करणेत यावा असे नमूद आहे. परंतु ही तरतूद कायद्यात किंवा विनियमात अन्य तरतूद नसल्यास लागू होईल. शिवाय कलम ४.४ मधील परंतुक अत्यंत स्पष्ट आहे. त्यामुळे सदर कलम ४.४ हे वि.प. यांच्या मदतीस येत नाही. प्रतिक्षा यादीतील क्रमांक किंवा प्रथम येणा-यास प्रथम हे तत्व कायद्यातील स्पष्ट तरतूदी पुढे गौण ठरतात. कृतिमानके विनियमात, वीज जोडणी देण्यात विलंब केल्यास भरपाईची तरतूद आणि विद्युत कायदा कलम ४३ (३) मध्ये दंडाची तरतूद केली आहे. अर्थात , या प्रकरणांमध्ये तक्रारदारांचे प्रतिनिधी यांनी भरपाईची मागणी स्वत:हून मंचासमोर सोडून दिली आहे.

९) वरील सर्व परिस्थितीत, सर्व तक्रारदार हे निश्चित केलेल्या कालमर्यादेत वीज जोडणी मिळणेस पात्र आहेत असे आमचे निष्कर्ष आहेत

त्यामुळे खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

**<u>आदेश</u>**

१) तक्रारदार यांना दि. ३१-०८-२०१७ पर्यन्त वि.प. यांनी सदर तक्रारदारांच्या अर्जानुसार कृषी पंपासाठी नविन वीज जोडणी द्यावी असा वि.प. यांना आदेश करणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |